**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

- **महाराष्ट्र शासनाच्या "शासन आपल्या दारी" या २ दिवसीय शिबिराची आज पासून सूरूवात...**

मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. यांच्या "सर्व लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा एकाच छताखाली लाभ" या संकल्पनेतून साकारलेल्या महाराष्ट्र शासनाचे "शासन आपल्या दारी" या योजनेची सुरूवात ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी मा. आमदार प्रताप सरनाईक, मा. आमदार गीता जैन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांच्या उपस्थित शुभारंभ करण्यात आला.

भाईंदर प. येथील मॅक्सस मॉल, भाईंदर पू. येथील नवघर नाका, हनुमान मंदीर तसचे मिरा रोड येथील TMT बस स्टॉप जवळ आजच्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिरात, आयुष्यमान भारत, PM स्वनिधी, आधार कार्ड अपडेट, परवाना, मालमत्ता कर हस्तांतरण, असेसमेंट उतारा, महिली व बालकल्याण विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना, क्षयरोग DBT योजना, जननी सूरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना या योजनांचे लाभ देण्यात आले.

सदर, उद्घाटन प्रसंगी महानगरपालिका मा. अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, मा. अति. आयुक्त अनिकेत मनोरकर, सर्व उपायुक्त, नोडल अधिकारी, समाजविकास अधिकारी, महिला बाल कल्याण अधिकारी, सर्व सहा. आयुक्त, इतर अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते. "शासन आपल्या दारी" या उपक्रमाच्या दोन दिवसीय शिबिराचे लाभ शहरातील जास्तीत जास्त नागरीकांनी घेण्याचे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांनी नागरीकांना केले.

Scanned with CamScanner